# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर - वसई-विरार
यांचे कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व,
जि. ठाणे दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


प्रेस नोट :- ३११/२०२३ दिनांक – ०४/११/२०२३

## “ २ लाख ९० हजार रुपयेच्या एम.डी या अंमली पदार्थ, रोख रक्कम व इतर साहित्य असा एकुण ४,२०,०१०/- रुपये मालासह एका आरोपीला मध्यवर्ती गुन्हे शाखेकडून अटक. ”

मिरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्ताल परिसरात अंमली पदार्थ विक्री करण्याऱ्या इसमांविरुध्द कठोर करणे बाबत सुचना देण्यात आल्या आहेत.

त्याअनुषंगाने मा. पोलीस उप आयुक्त गुन्हे, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त गुन्हे यांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शना प्रमाणे मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी गोपनीय बातमीदार याचे मार्फतीने बातमी मिळवुन दिनांक ०२/११/२०२३ रोजी १८.३० वा. गोल्डन नेस्ट ते इंद्रलोक रोडवर हनुमान मंदिर येथून आरोपी नामे अलकेश रामचंद्र म्हसकर, वय-३९, धंदा-नोकरी, रा. अे/५०१, साई पराग इन्क्लेव्ह, शिर्डी नगर, नवघर रोड, भाईंदर पुर्व, ता.जि. ठाणे याचे ताब्यातुन २९ गॅम एमडी हा अंमली पदार्थासह ०१ वजनकाटा, ०१ बजाज अव्हेन्जर मोटर सायकल, रोख रक्कम, एक चमचा, प्लास्टिक पिशव्या, एक आयफोन मोबाईल असा एकुण ४,२०,०१०/- रु. मालासह ताब्यात घेण्यात आले आहे.

सदर आरोपीता विरुध्द नवघर पोलीस ठाणे ६६५/२३, एन.डी.पी.एस.कायदा कलम ८ (ब), २१ (ब), प्रमाणे दाखल करण्यात आला असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास नवघर पोलीस ठाणे करीत आहे.

सदरची कारवाई श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप-आयुक्त (गुन्हे), व श्री. अमोल मांडवे, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शखाली मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पो.नि. राहुल राख, पो.उप.निरी. हितेंद्र विचारे, पो.हवा.मनोहर तावरे, संग्राम गायकवाड, राजवीर संधु, यांनी केली आहे.